जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ५४४ दिनांक - २५/१२/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मौजमजेसाठी दुचाकी गाडया चोरणा-या विधीसंघर्षित बालकाकडुन दोन दुचाकी वाहने जप्त

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन हद्दीत वाहन चोरीचे गुन्हयांचे प्रमाण वाढल्यामुळे वरीष्ठ पोलीस निरीक्षक डी.एस.पाटील यांनी तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार यांना पोलीस स्टेशन अभिलेखावरील उघडकीस न आलेल्या वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना देवुन मार्गदर्शन केले होते.

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस स्टेशन हद्दीतील वाहन चोरांबाबत माहीती घेत असताना पोलीस अंमलदार **महेश बारवकर व मितेश चोरमोले, सागर बोरगे,अभिनय चौधरी,** यांना त्यांचे बातमीदारामार्फेतीने बातमी मिळाली की, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील रेकॉर्डवरील विधीसंघर्षीत बालक हा चोरीची गाडी घेवुन फिरत आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने नमुद बालकास त्याचे ताब्यातील दुचाकी गाडी सह ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता त्याने सदरची गाडी चोरी केल्याची कबुली दिल्याने सदरची दुचाकी गाडी जप्त करण्यात आली असुन नमुद विधीसंघर्षित बालकाकडे आणखीन केले तपासामध्ये आणखीन एक दुचाकी गाडी जप्त करण्यात आली आहे, त्याच्याकडून खालील प्रमाणे गुन्हे केल्याचे उघडकीस आले आहेत.

१, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५९४/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३०३(२)
२, भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७२७/२०२४, भारतीय न्याय संहीता कलम ३०३(२)

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुकत,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे,श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उप आयुक्त परि.२ श्रीमती स्मार्तना पाटील, मा. सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, श्री.राहुल आवारे यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री डी.एस.पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्रीमती संगीता देवकाते, श्री.राहुलकुमार खिलारे, तपास पथकाचे अधिकारी पोलीस उप-निरीक्षक निलेश मोकाशी, पोलीस अंमलदार महेश बारवकर, मितेश चोरमाले, सागर बोरगे, मंगेश पवार, चेतन गोरे,सचिन सरपाले, सचिन गाडे, निलेश खैरमोडे, अभिनय चौधरी यांच्या पथकाने केली आहे.


पुणे शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत
महाराष्ट्र पोलीस
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे
दुरध्वनी क्रमांक: ०२०-२४३६५१००
पुणे पोलीस
PARKING ONLY
FOR
POLICE STAFF